Historicity Research Journal
Volume 2 | Issue 6 | Feb 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# " शेतकरी आत्महत्या कारणे आणि मानशास्त्रीय समुपदेशन "

**भानुसे के. एल.**
इतिहास विभाग, शिवाजी महाविद्यालय, कन्नड

**प्रस्तावना :**

मोडलेल्या माणसांचे दु:ख ओले झेलतांना
त्या अनाथांच्या उशाला, दीप लावून झोपतांना,
कोणती ना जात ज्यांची, कोणता ना धर्म ज्यांना
दु:ख भिजले दोन अश्रु, माणसांचे माणसांना

या ना. धो. महानोरांच्या काव्यपंक्तींच्या आधारे ज्यांना धर्म नाही ज्यांना जात नाही असा एकच धर्म म्हणजे कष्ट आणि राब- राब राबणे असा शेतकरी शब्दप्रयोग उच्चारला जातो तेव्हा भारत देशांच चित्र पटकन आपल्या समोर उभे राहते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. आजही भारतात ६५ ते ७० % लोक शेती आणि शेतीशी निगडीत व्यवसाय करतात. त्यात अग्रेसर महाराष्ट्र आहे कारण महाराष्ट्र हा दज्याखोज्यांचा, नद्या नाल्यांचा, किल्ल्यांचा, दुर्गाचा व साधुसंताचा आणि समाजसुधारकांचा व खज्या राजकारणी आणि शेतकरी वर्गाला जन्मास घालणारा राष्ट्र म्हणुन त्याची ओळख आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक नकाशाप्रमाणे काही भाग पडतात. खान्देश, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा होय. या राष्ट्राला शेतकज्यांची जान असणारे शेतकज्यांची तळमळ असणारे नेते, कृषिमंत्री, समाजसुधारक होऊन गेले. मग त्यात डॉ. पंजाबराव देशमुख, मा. यशवंतरावजी चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतरावजी नाईक, धनंजय गाडगीळ, यांच्यासारखी सहकाराची जाण असणारे नेते असुनसुद्धा शेतकरी आत्महत्या करतात. त्यांची कारणे शोधतांना शेतकज्यांचा आसुड लिहीणारे म. ज्योतीबा फुले यांची आठवण होते ते शेतकज्यांच्या व्यथा आपल्या पुस्तकात १८८३ ला लिहीतात तरीसुद्धा शेतकरी आत्महत्या होण्यास काही घटक जबाबदार आहेत. ते म्हणजे शेती, शेतकरी, सहकार चळवळी, उपेक्षित वर्ग, दलित वर्ग, आदिवासी समाज, भुमिहीनांचा समावेश, कष्टकरी वर्ग, अर्थकारण, समाजकारण, राजकारण, आणि समाजातील रुढीपरंपरा, चालिरिती, शैक्षणिक सुविधांचा अभाव, प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, अपुज्या सोयीसुविधा या सर्व घटकांचा समावेश शेतकरी आत्महत्या होण्यास कारणीभूत आहेत. त्याची चर्चा करणे हे माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. त्यांची कारणे व उपाय खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. निसर्ग, शेती व शेतकरी :**

तसं पाहीलं तर मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील शेती ही निसर्गाच्या तालावर नाचणारी आहे आणि निसर्गाचा लहरीपणा आता दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यालाही कारणीभुत माणुसच आहे कारण माणुस जंगलतोड, प्लास्टीक वापर, जलसिंचनाचा दुरूपयोग करत असल्यामुळे असे होणारच पण, महाराष्ट्रात कधी प्रचंड पाऊस तर, कधी दुष्काळ त्यामुळे पिके वाळुन जातात नाही तर जळून जातात. यावर उपाय म्हणून शासन दरबारी कृत्रिम सिंचनाची व्यवस्था झालेली दिसत नाही. नियमीत आपत्तीमुळे उत्पादनाची पातळी घसरते आणि शेतकज्यांच्या दारिद्र्यात वाढ होत जाते. त्याचा आत्मविश्वास, जिद्द आणि उमेद खचून जाते. आणि शेतकरी आत्महत्या सारखा जवळचा मार्ग शोधतात. त्याची मानसिकता प्रबळ करणे गरजेचे आहे.

**२. शेती मालाल हमी भाव नाही ?**

स्वातंत्र्योत्तर काळात शेती आणि शेतकरी यांच्यासाठी काही सुधारणा झाल्या असतील खरे पण दुष्काळ, कधी महापूर, टोळधाडी, रोगराई आणि नैसर्गिक आपत्ती यांनी शेतकज्यांच्या दु:खात भरच टाकली आहे. शेतीमालच्या उत्पादन खर्चावर आधारीत भाव शेतकज्याला कधीच दिला गेला नाही. त्याला नेहमीच त्याच्या पदरी निराशा आली आणि त्याने आत्महत्यासारखे गंभीर मार्ग स्विकारायला सुरूवात केली. जेवढा भांडवली खर्च शेतकरी करतो तेवढा हमी भाव शेतकज्याला कधीच मिळत नाही. जगात अशी कोणतीच घटना नाही की, आपल्या वस्तुचा भाव ठरविण्याचा अधिकार मालकाला नसुन तो व्यापाज्याला आहे परंतु आपल्याकडे उलट आहे ते म्हणजे शेतकज्याचा माल आणि शेतकज्यांची शेती म्हणजे जुगार समजला जातो. अहो, शेतकज्यांचा माल जेव्हा व्यापाज्याच्या ताब्यात जातो तेव्हा मालाच्या किंमती वाढतात म्हणजे भांडवलदार व्यापारी गलेगठ्ठ होतात आणि शेतकरी बीयाणांचे खताचे व कर्जाचे पैसे फेडताफेडता त्यागुन जातो आणि आत्महत्या करतो.

**३. विजेचा प्रश्न :**

तस पाहीलं तर शेतकरी आणि व्यापारी यांची तुलना जर विज वापराच्या संदर्भात करावयाची झाली तर ती खुप भयानक आहे. करण आजकाल लोडशेडींग असा शब्दप्रयोग होऊ घातलेला आहे तरी सुद्धा २४ % विज घरगुती वापरली जाते आणि ८६ % विज औद्योगिक व शेतीला वापरली जाते त्यामध्ये सुद्धा रात्री असते. मग तो शेतात गेला की त्याने अंधारात जावे संकटाशी सामना करावा व उद्योगाला २४ तास वीज त्यांना कसली लोडशेंडीग हा प्रकार त्यांच्यासाठी नाही. शेतकऱ्यांची डीपी जळाली तर कितीही चकरा मारा, त्याला ती मिळणार नाही. मिळालीच तर सर्व माल वाळून गेल्यावर मग तो आपली यात्रा संपविण्याचा मार्ग निवडतो.

**४. सिंचन सुविधांचा अभाव :**

भारतातील शेती हा बहुतांश कोरडवाहू आहे आणि कोरडवाहू शेतीत उत्पादनाची शाश्वती नसते आणि शेतकरी कायम चिंतेत असतो. कारण पावसाळा हा चारच महिने असतो नैसर्गिक परिस्थितीत २० ते ४० टक्के पाणी वाहून जाते आणि १५ ते २० टक्के पाणी पिक वाढीसाठी राहते. वाहून जाणाऱ्या पाण्याबरोबर सुपिक माती वाहून जाते आणि कालांतराने जमिन नापिक बनते. म्हणून पंचवार्षिक योजनेतसुद्धा जलसिंचनाला महत्व दिलेले आहे. परंतु ते फक्त कागदावरच असते. शासनाच्या शेततळी, विहीरी, बंधारे, बांध या योजना येतात. परंतु प्रत्यक्षात त्याची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे काही योजना ह्या कागदावरच असतात. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकत नाही. मग शेतकरी निसर्गावर अवलंबून राहतो आणि आत्महत्येसारखा मार्ग शोधतो.

**५. सहकार क्षेत्राविषयी शेतकऱ्यांची मानसिकता :**

जर शेतकऱ्यांची परिस्थिती आणि शेतकरी आत्महत्या ही समस्या संपवायची असले तर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासुनच मान्य आहे की, सहकार क्षेत्रातुन शेती केली पाहीजे. परंतु त्यांची अमंलबजावणी कशी करायची याची माहिती आजही उपलब्ध नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकार शेती अंमलात येतील असे नमूद केले होते. १९५९ ला सहकार व सामुदायिक शेतीची रुपरेषा ठरविण्यात आली होती. त्यात कायद्याने सक्ती नसावी ही एक अट होती. शेती सुधारावयाची असेल तर शेत मालाची खरेदी विक्री, कर्ज वाटप, शेतमालाची प्रक्रीया, सहकारी पतसंस्था, वेअर होऊस, सोसायटी, सहकारी बँक, बांदावर खत, बियाणे, ग्रामीण विजय पुरवठा, सहकारी नागरी पतपेढ्या आणि सावकारांचा हस्तक्षेप यामुळे शेतकरी हा सहकार क्षेत्रापासुन दूर होतांना दिसतो. याचे कारण सहकार धोरणांनी शेतकऱ्यांची विश्वासार्हता गमावल्यामुळे आणि कोणतीही गोष्ट शेतकऱ्यांना होणारा त्रास सरकार दरबारी माराव्या लागणाऱ्या चक्रा व त्यांना जवळचा उपलब्ध असाणारा मार्ग म्हणजे सावकाराकडून सहज उपलब्ध होणारा कर्जाचा पुरवठा यामुळे शेतकरी गोंधळाच्या चकरात सापडला आणि शेतकरी आपली जमिन सावकाराला खरेदी किंवा गहाण म्हणून देवू लागला आणि त्याच्या व्याजाचे प्रमाण जास्त असते. परिणामी त्याला आपली जमिन सोडवता न आल्यामुळे तो आत्महत्यासारखे मार्ग अवलंबतो.

**६. स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी :**

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे पंचायत समिती, जिल्हापरिषद या ठिकाणी शेतकऱ्यांच्या संदर्भात शेती विषयक अवजारे व शेती उपयुक्त साधने असतात आणि ती शासनाच्या मार्फत अनुदानावर मिळत असतात. परंतु जेव्हा शेतकरी तेथे जातो तेव्हा तेथे ती साधने गरजुवंत किंवा गरीब शेतकऱ्याला न मिळता ते कुठल्यातरी एजंट किंवा धनदांडग्याला मिळत राहते आणि तेथे सुद्धा मोठ्या प्रमाणात भ्रष्ट्राचार घडून येतात. शेतकरी मात्र चकरा मारून थकतो त्याला काही मिळतच नाही. त्यामध्ये नांगर, वखर, पंप, शेततळी, मत्स्यव्यवसाय, नेट, विहीर, बैलजोडी, ठिबक अशा घटकांचा समावेश होतो.

मानसशास्त्रीय समुपदेशन व उपाय :

**१. पिक विमा बंधनकारक :**

शेतकऱ्याला जर आत्महत्येपासुन वंचित ठेवायचे असेल तर त्याचे समुपदेशन केले पाहीजे. त्याच्या पिकांचा विमा हा बंधनकारक असला पाहीजे. कारण कारखानदारी व्यवसायात किंवा व्यापारात संपुर्ण त्यांच्या भांडवालचा विमा काढला जातो व काही नैसर्गिक आपत्ती आली तर ताबडतोब त्याचा फायदा मिळतो पण शेतकऱ्यांच्या पिकांवर काही संकटे आली तर ते त्याला मिळत नाही आणि मिळालेच तर त्यामध्ये अनेक वाटे असतात त्याचे अनुदान किंवा विम्याचे हप्ते हे थेट खात्यावर जमा झाले पाहिजे.

**२. माती परीक्षण :**

माती परिक्षणामुळे शेतातील नमुन्याचे प्रामुख्यान रासायनिक पृथ्थकरण करून त्यातील मुख्य, दुय्यम व सुक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाण तपासले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांला जमिनीची पोत व अन्नद्रव्यांची उपलब्धतात समजते. जमिनीतील युक्त चुनखडीचे प्रमाण समजे आणि आपली जमिन क्षारयुक्त आहे की, पोषणयुक्त आहे याची माहिती मिळते. एकंदरीत माती परिक्षणामुळे सुपिकता व उत्पादकता कळते. माती परिक्षण ३-४ वर्षात एकदा जरी केले तरी चालते त्यामुळे शेतकऱ्याला फायदा असा होऊ शकतो की, त्याला खताची मात्रा, बियाणाची निवड व कोणत्या शेतात कोणते पिक येऊ शकते हे कळते. त्यामुळे रोगांचे प्रमाण कमी होते व शेतकरी संकटातून वाचू शकतो. किमान आत्महत्या तरी करणार नाही.

**३. मानशास्त्रीय समुपदेशन :**

कुटूंब हा समाजातील एक प्राथमिक समुह आहे. त्यामुळे पहिल्यांदा कुटूंबाचे समुपदेशन झाले पाहीजे आणि शेतकऱ्याच्या समस्या परवानाधारक समुपदेशकाकडून समुपदेशन झाले पाहीजे.

**४. ठिबक सिंचनावर अनुदान :**

राज्यात दरवर्षी पडणारा दुष्काळ लक्षात घेता ठिबक सारखी यंत्रणा शेतकऱ्यांना वापरणे गरजेचे आहे. राज्यात सरासरी १४ लाख हेक्टर क्षेत्रावर सुक्ष्म सिंचन प्रमाणालीचा वापर होतो आहे. ह्या पद्धतीमुळे पाण्याचा वापर कमी होतो आणि पिकाया मुळाशी आहे. त्या पाण्यावर भाजीपाला पिकवला जातो. परंतु सरकार शेतकऱ्याला कर्ज माफी अनुदान, यासारख्या फसव्या घोषणा करीत असेल तरी शेतकऱ्याला सिंचनासाठी ठिबक वापर हा बंधनकारक करून त्याच्या अनुदानात भरघोस वाढ करावी व पाईप आणि शेती उपयोगी वस्तुंचे अनुदान त्याच्या खात्यावर जमा करावे. परिणामी शेतकरी हताश होणार नाही याची जबाबदारी आता समुपदेशकांवर ठेवावी.

**५. बि - बियाणांची निवड व खतांचे भाव :**

शेतकऱ्यांनी बियाणे विकत घेतांना होणाऱ्या फसवणुकीस आळा बसावा व त्यांना योग्य दर्जाचे बियाणे मिळाव यासाठी
१९६६ मध्ये बि- बियाणे अधिनियम काढण्यात आला होता त्यात अनुवांषिकतेची मात्रा, खुणा, लाल-पिवळया रंगाच्या चिठ्या, गुणधर्म, शुद्धता, संकरित आणि सुधारित जातीचे बियाणे आणि त्याचे दर ठरवून दिलेले आहेत. परंतु आता असे होतांना दिसत नाही. बाजारात सर्रास फसवेगिरी चालते वाढीव दराने बियाणे व खत विकणाऱ्या व्यापाऱ्यावर कारवाई करावी लागते आणि दुकानांना सिल करावे लागते त्यामुळे शेतकऱ्याला बियाणे व खतांच्या किंमती नियमित करून मालाचे भाव निश्चीत केले पाहीजे तर शेतकरी आत्महत्या करणार नाही.

**६. मानसिक वृत्ती व समुपदेशानाचा परिणाम :**

प्रत्येक मनुष्य दैनंदिन जीवनात जगत असतांना वेगवेगळ्या परिस्थितीत वाटचाल करत असतो. त्याला अनेक प्रश्न भेडसावत असतात काही सज सुटतात तर काही सोडविण्यासाठी मानसशास्त्रीय समुपदेशकांची गरज असते आणि त्या व्यक्ती सल्लार्थी समुपदेशकाकडून अर्थपूर्ण मुल्यमापन करून घेत असतांना त्याच्याकडून सकारात्मक मानसिकता, समस्यांचे उत्तर, व्यक्तीगत परिणामकारकता, निर्णय प्रक्रीया आणि वर्तनातील बदल इ. चा सल्ला घेतला पाहीजे. तरच शेतकरी आत्महत्या करणार नाही.

**७. तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व समुपदेशन :**

शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये यासाठी कृषि विद्यापीठातील तज्ञ प्राध्यापक व मानशास्त्रातील समुपदेशक यांची व्याख्याने खेड्यात आयोजीत केली पाहीजे. त्यांना अडचणीवर मात करून जगातील मोठी व्यक्तिमत्व त्यांच्या समोर उभी करावीत व त्यांची उदाहरणे देऊन शासनाच्या योजना समजावून सांगून त्यांचे समुपदेशन करणे गरजेचे आहे. तेव्हाच शेतकरी राजा आत्महत्या करणार नाही. बळी राजा सुखी तर जग सुखी अशी म्हण आहे. त्यांना समजावून सांगणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

शेतकरी आत्महत्या कारणे, शोध व मानशास्त्रीय उपाय यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तरी या महत्वाच्या उपाय योजना शिवाय अजुनही काही मानसशास्त्रीय समुपदेशन बंधनकारक केले पाहीजे तरच शेतकरी आत्महत्या थांबवू शकतात.

१. शेती उपयुक्त योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पाहेचविणे. पथनाट्य व संगणकाद्वारे प्रशिक्षण देणे.
२. उत्पादन खर्चावर ५० % देणे असा कायदा करावा.
३. शासनाने शेतकऱ्यांचा विमा काढणे बंधनकारक करावे.
४. शेतीतील रस्त्याचा प्रश्न प्रशासकीय पातळीवर सोडविणे.
५. आधुनिक शेतीचा उपयोग करणे. तंत्रज्ञानाचा वापर करणे.
६. शेतीला पुरक व्यवसाय व माल प्रक्रीया उद्योग सुरू करावेत.
७. शिवरायांची जमिन महसुल पद्धत अंमलात आणणे.
८. ढगाळ वातावरण असेल तेव्हाच कृत्रिम पाऊस पडला पाहीजे.
९. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची निवड बंधनकारक करणे इ. उपाय शेतकरी आत्महत्या करू नये राबविता येऊ शकतात.

निष्कर्षांअंती ऐवढेच निदर्शनास येते की, शेतकऱ्यांच्या उपेक्षा कधीच संपणार नाहीत. त्यांच्या भावना या कवितेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न.

पीक पोटरीत तरी,
काय त्याचा भरवसा,
धडधाकट शरीर,
मंधी तुटलेल्या नसा,
असे किती चंद्र आले,
कपाशीच्या शिवारात,
नाही उजेडली त्यान,
गर्भारशी काळीरात

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**संदर्भ :**

१. शेतकज्यांचा आसुड - म. ज्योतीराव फुले, संपादक - कौ. तो. ठाले पाटील
२. शेतकज्यांचा आसुड - म. ज्योतीराव फुले, संपादक - वासुदेव मुलाटे
३. शेतकज्यांचे शरद पवार - अशोक पाटील
४. मराठवाड्यातील शेतकरी चळवळ - डॉ. राजाभाऊ करपे
५. नामदेव शेतकरी - जगदिश कदम
६. बळीराजा विशेषांक - मे. २०१४
७. बळीराजा विशेषांक - जून २०१५
८. समुपदेशन मानशास्त्र, प्रा. बी. एस. पवार, डॉ. जी. बी. चौधरी, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.
९. समुपदेशन शास्त्रीय प्रक्रीया व उपाययोजना, प्रा. डॉ. चंद्रशेखर देशपांडे, उन्मेष प्रकाशन, पुणे.
१०. अपसामान्यांचे मानसशास्त्र, डॉ. मानसी राजहंस, प्रा. अनघा पाटील, डॉ. सुशिल सुर्वे, उन्मेष प्रकाशन, पुणे.